परिविक्षाधिन सहायक प्रकल्प अधिकारी/ संशोधन अधिकारी, महाराष्ट्र आदिवासी विकास सेवा गट- ब या पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती देणेबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन आदेश क्रमांकः नोकभ-१११७/प्र.क्र.२३० /का.१५**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: ०७ मे, २०१८

वाचा :-

**महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे पत्र क्र. ९६६(९)/३०७३/पंधरा, दि.२३/०१/२०१८**

**शासन आदेश :-**

महाराष्ट्र आदिवासी विकास सेवेतील सहायक प्रकल्प अधिकारी /संशोधन अधिकारी गट-ब (वर्ग-२) या संवर्गातील पदांवर नियुक्ती करण्यासाठी देण्यात आलेली परिक्षा-२०१५ च्या अंतिम निर्णयाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संदर्भाधिन पत्रान्वये शिफारस केलेल्या खालील उमेदवारांना महाराष्ट्र आदिवासी विकास सेवेतील वर्ग-२ मधील रुपये. ९३००-३४८००+ ग्रेड पे ४४०० या वेतनश्रेणीतील परिविक्षाधिन सहायक प्रकल्प अधिकारी /संशोधन अधिकारी गट-ब या पदांवर नामनिर्देशनाने परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधिन राहून दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीकरिता नियुक्ती करण्यात येत आहे. नियुक्तीनंतर त्यांची पदस्थापना खालील तक्त्यातील स्तंभ ६ मध्ये नमूद केलेल्या पदावर व कार्यालयात करण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव | नियुक्तीचा प्रवर्ग | गुणवत्ता यादीतील अ.क्र. | सा.प्र.वि च्या अधिसुचनेनुसार वाटप केलेला महसुली विभाग | पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्रीमती गितांजली निकम | खुला (महिला) | ३७ | अमरावती | सहायक प्रकल्प अधिकारी, प्रकल्प कार्यालय,पुसद |

२. उपरोक्त उमेदवारांची सहायक प्रकल्प अधिकारी /संशोधन अधिकारी या पदावर प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणांच्या अधिनतेने त्यांची ज्येष्ठता राहील.

२) परिच्छेद -१ मध्ये नमूद केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर निर्देशिलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत तात्काळ रुजु व्हावे. सदर विहीत मुदतीत जर

त्यांनी नियुक्ती स्विकारली नाही,तर आयोगाने घेतलेल्या परिक्षेत त्यांनी मिळविलेल्या गुणवत्ताक्रमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेली ज्येष्ठता मिळणार नाही. शिवाय प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तर त्यांचे नाव कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील. यानुषंगाने सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-१०७६/बारा, दि.२१/०६/१९८२ मधील तरतूदी व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा सदरहू उमेदवारांना लागू राहतील. तसेच संबंधित उमेदवारांनी नियुक्ती स्विकारण्यास करावा लागणारा प्रवास खर्च स्वत: करणे आवश्यक आहे.

३) सदरहू उमेदवारांनी सहायक प्रकल्प अधिकारी /संशोधन अधिकारी या पदाचा कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून त्यांचा परिविक्षा कालावधी सुरु होईल आणि तो दोन वर्षाचा राहील. दोन वर्षाकरीता सदर उमेदवार परिविक्षाधीन सहायक प्रकल्प अधिकारी व संशोधन अधिकारी म्हणून अनुक्रमे आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांच्या नियंत्रणाखाली राहतील.

४) सहायक प्रकल्प अधिकारी /संशोधन अधिकारी या पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांस त्यांची प्रथम वेतनवाढ देण्यास परिविक्षाधीन कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर अनुमती देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ त्यांनी परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

५) जे उमेदवार परिविक्षाधीन कालावधीत प्रशिक्षण समाधानकारकरित्या पूर्ण करणार नाहीत, तसेच ज्यांची वर्तणूक अयोग्य/ असमाधानकारक / संशयास्पद आढळेल त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच त्यांच्या गैरवर्तणूकीच्या कारणास्तव किंवा त्यांनी नोकरीच्या किंवा सेवेच्या शर्ती भंग केल्या असतील त्यावेळी त्यांची सेवा कोणतीही पुर्व सूचना न देता शासन समाप्त करु शकेल .

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.६१/ २००१/३९, दि. १९ मार्च, २०१३ अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी / वापराबाबतचे ज्ञान एक अतिरिक्त अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. यानुसार नियुक्त केलेल्या उमेदवाराने शासन मान्यता प्राप्त संगणक हाताळणी /वापराबाबतचे आवश्यक ते प्रमाणपत्र दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील. उमेदवारांकडून विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर केले जाते की नाही याबाबत तपासणी करण्याची व आवश्यकतेनुसार शासनास अहवाल सादर करण्याची जबाबदारी आयुक्तालय, आदिवासी विकास, नाशिक व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे कार्यालयाची राहील .

७) उपरोक्त उमेदवारांची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखुन ठेवण्यात येईल.

८) उपरोक्त उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम , १९८१ मधील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येईल.

९) उपरोक्त उमेदवारांनी परिविक्षाधीन कालावधीत विभागीय परिक्षा विहित मुदतीत व विहित संधीत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. अन्यथा याबाबत प्रचलित नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

१०) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. अंनियो-१००५/ १२६/ सेवा-४, दि.३१/१०/२००५ मधील तरतुदीनुसार दि.०१ नोव्हेंबर,२००५ रोजी किंवा त्यानंतर ज्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू ठरेल. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४ ) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही. मात्र उपरोक्त उमेदवारांपैकी जे शासकीय कर्मचारी दि.०१ नोव्हेंबर, २००५ पुर्वी शासन सेवेत निवृत्तीवेतनार्ह आस्थापनेवर कार्यरत असतील, त्यांना शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. पवमां- अंनियो-१००६/८७/सेवा-४, दि.१२ जानेवारी, २००७ मध्ये नमूद केलेल्या अटींच्या पुर्ततेच्या अधिन राहून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू ठरतील. दि.१८/०८/२००९ च्या परिपत्रकात नमूद (i) ते (iv) येथील सर्व अटींची पुर्तता ज्या प्रकरणी होत नसेल अशा शासकीय कर्मचाऱ्यास नवीन परिभाषित अंशदान निवृतिवेतन योजना लागू ठरेल.

११) शासकीय सेवेत रुजू झाल्यानंतर ज्या उमेदवारांना शासकीय सेवेतून राजीनामा द्यावयाचा आहे त्यांनी एक महिन्याची पूर्वसूचना आयुक्त ,आदिवासी विकास, नाशिक यांच्यामार्फत शासनास पाठविणे आवश्यक राहील अथवा एक महिन्याचे वेतन शासनाकडे जमा करणे आवश्यक राहील.

१२) संबंधित उमेदवारांना शासन अधिसुचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र. ५६/ कार्या.१२, दि.२८ एप्रिल, २०१५ व दि.१५.०६.२०१७ मधील तरतुदी विचारात घेऊन संबंधित महसूल विभागातील रिक्त पदांवर नियुक्ती देण्यात आलेली आहे. तसेच सहायक प्रकल्प अधिकारी /संशोधन अधिकारी पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार हा राज्यस्तरीय संवर्ग आहे. सबब,

नियुक्तीचा विभाग कोणत्याही परिस्थितीत बदलून देण्यात येणार नाही. तसेच याबाबत कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव आणल्यास सदर कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ नुसार शिस्तभंग ठरेल व संबंधीतांविरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१३) वर नमूद केलेल्या अटी व शर्तीव्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांना लागू असलेले महाराष्ट्र नागरी सेवाविषयक सर्व नियम सर्व संबंधित उमेदवारांना लागू राहतील.

१४) नियुक्त केलेले उपरोक्त अधिकारी सदर पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी समकक्ष पदावर बदलीस पात्र राहतील.

१५) सदर उमेदवारांना नियुक्त्या श्रीमती. तेजस्विनी गलांडे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेली रिट याचिका क्र. ५३९७/ २०१६ , श्रीम.प्रेमलता बुरांगे यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर येथे दाखल केलेली रिट याचिका क्र.१०८/ २०१६ तसेच श्रीम. शालिनी राऊत यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपीठ , औरंगाबाद येथे दाखल मूळ अर्ज क्र. ८९७/२०१६ वरील मा.न्यायालयांच्या /न्यायाधिकरणांच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत.

१६) सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०१५/ प्र.क्र.१५६/का.१२, दि.२८/०४/२०१५ अन्वये सरळसेवेने नियुक्तीसाठी महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित ) पदांवर विभागीय संवर्ग व विभागीय संवर्ग वाटप नियमावली तयार करण्यात आली असून त्यानुसार उपरोक्त उमेदवारांना विभागीय संवर्ग वाटप करण्यात आले आहेत. सदर अधिसूचनेतील तरतुदीनुसार गट-ब संवर्गात नियुक्त झालेल्या उमेदवारांना वाटप झालेल्या विभागीय संवर्गात किमान नऊ वर्षे इतका कालावधी पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यानुषंगाने उपरोक्त उमेदवारांना वाटप करण्यात आलेल्या महसूली विभागीय संवर्गात नऊ वर्षे सेवा करणे आवश्यक राहील.

३. श्रीमती गलांडे यांच्या रिट याचिका क्र. ५३९७/२०१६ मधील Civil Application क्र.१०१७/२०१७ मधील मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अमागास (महिला) वर्गवारीचे एक पद रिक्त ठेवण्यात आले आहे.

४. हे आदेश प्राप्त होताच संबंधित उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक व आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,पुणे यांच्यामार्फत शासनास सादर करावा.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५०७१३००३६७२२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subrao Narayan Shinde

Digitally signed by Subrao Narayan Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ffa7b5a27faed7560194e6272933cfa60dca1eb8ab54859eae7920c9d0d1f622, cn=Subrao Narayan Shinde
Date: 2018.05.07 13:04:45 +05'30'

**( सु.ना.शिंदे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. मंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
२) मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई
३) सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
४) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
५) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
६) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
७) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता ) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई / नागपूर
८) महालेखापाल ( लेखा परीक्षा ) महाराष्ट्र राज्य १/२, मुंबई / नागपूर
९) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे / नाशिक/ अमरावती / नागपूर
१०) सर्व उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सर्व सहआयुक्त, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
१२) सर्व अवर सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,मुंबई
१३) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५) सर्व कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) संबंधित अधिकारी,
१७) निवड नस्ती (का.१५).